// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

GOVERNMENT OF MAHARASHTRA

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक :- ममआ-2021/EM/का-3/1315
दिनांक :- 06/12/2021

## नोटीस

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयामार्फत बहुचर्चित सामूहिक बलात्कार आणि हत्या प्रकरणाला "निर्भया केस" ला दिनांक 16 डिसेंबर 2021 रोजी 9 वर्षे पूर्ण होत आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यात महिला सुरक्षितेविषयी जागर मोहिमेच्या माध्यमातून चळवळ उभी रहावी, असा मा.अध्यक्षा, राज्य महिला आयोग यांचा मानस आहे. या चळवळीच्या माध्यमातून महिलाविषयक कायद्यांविषयी जाणीवजागृती व्हावी. तसेच घरी, कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक स्थळांवर महिलांवर होणा-या अन्यायाला वाचा फोडली जावी, यासाठी दिनांक 16 डिसेंबर 2021 रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्याकरीता कार्यक्रम व्यवस्थापक (Event Managements) साठी नामांकित संस्थांकडून सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्याकरीता संपूर्ण माहितीसह सीलबंद लखोट्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक असणा-यांनी **आपल्या लेटरहेडवर कार्यालयास सादर करावीत. तसेच दरपत्रकामये G.S.T. नंबर लागूकर अकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावा. तसेच नोटीस संदर्भाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.**
त्यानुसार खालील प्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे.

- आदिशक्ती अभियानाचा एक लोगो तयार करण्यात यावा, ज्याचे लॉचिंग कार्यक्रमात करता येईल.
- सदर विषयावर एक परिसंवाद आयोजित करता येईल, ज्यात समाजातील काही मान्यवर महिलांचा सहभाग असेल. एक कलाकार, एक उद्योजिका, एक महिला पोलीस, समुपदेशक, NGO चे प्रतिनिधी, महिला वकील अशा महिलांचा या परिसंवादात सहभाग असेल.
- कार्यक्रमासाठी स्टेजवर एक LED आणि विषयानुसार स्टेजवरील मांडणी असावी.
- कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांना मा.अध्यक्षा यांच्या सहीचं एक सन्मानपत्र आपण देण्यात येईल.
- या संपूर्ण कार्यक्रमाचं 3 कॅमेरा सेटअपने व्हिडियो शूटिंग आणि फोटोग्राफी करावी.
- मा.अध्यक्षा यांचे काही फोटो वापरुन त्यांच्यावर 2 मिनिटांची AV बनवता येईल. मा.अध्यक्षा स्टेजवर येण्यापूर्वी ही AV लावल्यावर मा.अध्यक्षा यांच्या कार्याची एक झलक प्रेक्षकांना अनुभवता येईल.
- सभागृह आरक्षण, सभागृहातील व्यवस्था, व्यासपिठ राजशिष्टाचार, चहा व अल्पोपहार तसेच सभागृहाच्या प्रवेशद्वारापाशी एक गेट बांधावा ज्यावर कार्यक्रमाचं स्वरुप आणि मा.अध्यक्षा यांचा फोटो असेल. काही बॅनर स्टेजवर किंवा हॉलमध्ये लावण्यात यावे. ज्यावर अभियानाविषयी माहिती असेल.

सदर नोटीसद्वारे उपरोक्त पत्यावर दिनांक 14/12/2021 रोजीपर्यंत दुपारी 3.00 वाजेपर्यंत सादर करावीत. सदर दरपत्रके त्याच दिवशी दुपारी 03.00 वाजता उघडण्यात येतील. संबंधितांच्या अधिकृत प्रतिनिधींनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. तरी सदर बाबतचा अंतीम निर्णय संपूर्णत: महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

प्रशासकीय अधिकारी

ठिकाण :- मुंबई